आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ ऑक्टोबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर / २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात मतदान, २३ नोव्हेंबरला मतमोजणी
- विधान परिषदेवरच्या राज्यपालनियुक्त ७ सदस्यांचा शपथविधी
- राज्यातल्या आणखी ६ जातींना केंद्राच्या इतर मागासवर्गीयांच्या यादीत समाविष्ट करण्याची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाची शिफारस
- शेतकऱ्यांना किमान आधारभूत दरापेक्षा कमी दरात भरडधान्य विक्री करावी लागू नये म्हणून नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचा शासन निर्णय जारी

  **आणि**
- नैऋत्य मोसमी पावसाची देशातून माघार

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत निधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार निवडणूक अधिसूचना येत्या २२ तारखेला जारी होईल, २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, अर्जांची छाननी ३० ऑक्टोबरला होईल, तर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील.  २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

राज्यात २८८ पैकी २५ मतदारसंघ अनुसूचित जाती आणि २९ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. राज्यात विधानसभेसाठी एकूण १ लाख १८६ मतदान केंद्रं असतील. त्यापैकी २९९ मतदान केंद्रांचं व्यवस्थापन दिव्यांग, ३८८ मतदान केंद्रांचं व्यवस्थापन महिला पाहतील. ५३० आदर्श मतदान केंद्रं उभारली जाणार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर सुमारे ९०० ते १ हजार मतदार असतील.

त्यांच्यासाठी पिण्याचं पाणी, शौचालय, दिशादर्शक फलक, रॅम्प किंवा व्हीलचेअर, मदत केंद्र, पुरेसा प्रकाश आणि मंडप व्यवस्था ठेवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत. रांगांमध्ये थोड्या थोड्या अंतरावर बसण्याची व्यवस्था करण्याच्या सूचनाही आयोगानं केल्या आहेत. मुंबई, ठाणे आणि पुण्यातल्या काही मतदारसंघांमध्ये ४५ टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची नोंद होते. या भागात मतदानाचं प्रमाण वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाणार आहे.

<><><><>

झारखंड विधानसभेची तसंच १५ राज्यातल्या २ लोकसभा आणि ४८ विधानसभा मतदारसंघांची पोटनिवडणुकही केंद्रीय निवडणूक आयोगानं आज जाहीर केली. झारखंडमध्ये १३ नोव्हेंबर आणि २० नोव्हेंबर अशा दोन टप्प्यात ८१ मतदारसंघात मतदान होईल आणि महाराष्ट्रासोबत २३ नोव्हेंबरला मतमोजणी केली जाईल.

वसंतराव चव्हाण यांच्या निधनामुळं रिक्त झालेल्या नांदेड लोकसभा मतदारसंघात तसंच राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळं रिक्त झालेल्या वायनाड लोकसभा मतदारसंघातही पोटनिवडणूक होणार आहे. नांदेड लोकसभा आणि उत्तराखंडमधल्या केदारनाथ विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राच्या विधानसभेच्या वेळापत्रकानुसार निवडणूक होईल. इतर ठिकाणी १३ नोव्हेंबरला मतदान होईल.

<><><><>

राज्यात नजीकच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांवर झालेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अशाप्रकारे कुठलाही हिंसाचार होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना पोलिसांना दिल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले. निवडणूक काळात कुठलाही हिंसाचार होणार नाही, कुठलेही गैरप्रकार होणार नाहीत, पैशांची अवैध वाहतूक होणार नाही याकडे लक्ष ठेवण्याच्या स्पष्ट सूचना

दिल्या आहेत. त्यासाठी ३२२ चेक नाके कार्यरत राहणार आहेत. पोलीस, परिवहन विभाग, जीएसटी, उत्पादन शुल्क आणि वन विभागाला सर्व परिस्थितीवर एकत्रितरित्या लक्ष ठेवण्याचे आदेश दिल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या संदर्भात निर्णय घेताना सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आणि इतर दिशानिर्देश विचारात घेऊ, असं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज सांगितलं. निवडणूक आयोगाचं पथक मुंबई दौऱ्यावर असताना, रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी काँग्रेसनं केली होती. त्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते.

शरद पवार यांनी ट्रम्पेट हे निवडणूक चिन्ह बाद करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. मात्र ही मागणी मंजूर केली नसल्याचं आयोगानं आज स्पष्ट केलं. त्याचवेळी शरद पवार यांच्या पक्षानं केलेल्या सूचनेनुसार त्यांच्या तुतारी फुंकणारा माणूस या निवडणूक चिन्हात सुधारणा केल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

राज्यात आजपर्यंत नोंदणी झालेल्या ९ कोटी ६३ लाख मतदारांमध्ये ४ कोटी ९७ लाख पुरुष आणि ४ कोटी ६६ महिला आहेत. १ कोटी ८५ लाख हे २० ते २९ वयोगटातले मतदार आहेत. २० लाख ९३ हजार मतदारांनी यंदा पहिल्यांदाच मतदारयादीत नाव नोंदवलं आहे. कातकरी, कोलम, मारिया गोंड या विशेषतः आदिवासी जमातींमधल्या सर्व २ लाख ७७ हजार मतदारांची नोंद मतदार यादीत केल्याचं निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे. मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी इच्छुक पात्र नागरिकांना येत्या १९ तारखेपर्यंत अर्ज भरता येईल.

<><><><><>

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा ‘रणांगण विधानसभेचे’ हा कार्यक्रम गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम आपण ऐकू शकाल.

<><><><><>

विधान परिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ७ सदस्यांनी आज शपथ घेतली. त्यात चित्रा वाघ, विक्रांत पाटील, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, पंकज भुजबळ, इद्रिस नाईकवाडी, हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांचा समावेश आहे. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात त्यांना शपथ दिली. विधानपरिषदेवरच्या राज्यपाल नियुक्त ५ जागा अजून रिक्त आहेत.

दरम्यान या नियुक्त्यांना विरोध करणारी याचिका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी न्यायालयानं निकाल राखून ठेवलेला असताना या नियुक्त्या केल्याचं या याचिकेत म्हटलं होतं. मात्र, राज्यपाल निर्देशित १२ आमदारांच्या नियुक्तीला कोणत्याही प्रकारची हंगामी स्थगिती नव्हती किंवा सरकारनंही या नियुक्त्या करणार नाही अशी हमी दिली नव्हती. त्यामुळे आम्ही १२ पैकी ७ जणांच्या नियुक्त्या केल्याची माहिती राज्य सरकारनं उच्च न्यायालयात दिली. या प्रकरणी अंतिम निर्णय देताना याबाबत आपलं मत देऊ असं उच्च न्यायालयानं आजच्या सुनावणीत सांगितलं.

<><><><><>

राष्ट्रीय मागासवर्ग आयोगानं राज्यातल्या आणखी सहा जाती केंद्राच्या इतर मागासवर्गीय सूचीत सामिल करण्याची शिफारस केंद्र सरकारला केली आहे. कुलवंत वाणी, कुणबी वाणी, कराडी, कानोडी किंवा कनाडी, नेवेवाणी, सलमानी, तसंच निषाद - मल्ला - मल्लाह किंवा नाविक या सहा जातींचा समावेश केंद्राच्या

सूचीत करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं आयोगाकडे पाठवला होता. त्यावर गेल्यावर्षी १७ ऑक्टोबरला तसंच यावर्षी २६ जूनला मुंबईत आयोगानं जनसुनावणी घेतली त्यात सर्व कागदपत्र योग्य आढळल्यानं केंद्र सरकारला ही शिफारस केली असल्याचं राष्ट्रीय मागासर्ग आयोगानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

शेतकऱ्यांना किमान आधारभूत दरापेक्षा कमी दरात धान आणि भरडधान्य विक्री करावी लागू नये म्हणून नियंत्रण कक्ष स्थापन करण्याचा शासन निर्णय आज जारी करण्यात आला. आधारभूत दरापेक्षा कमी दरात कुणी खरेदी करत असेल तर हा कक्ष त्यावर नियंत्रण ठेवेल. त्यानुसार राज्यात खरेदी केंद्र सुरू करण्याचे आणि किमान आधारभूत दरानं धान्य खरेदी करण्याचे आदेश जारी केले आहेत. यानुसार राज्यामध्ये केंद्र शासनाची नोडल एजन्सी म्हणून भारतीय अन्न महामंडळ काम पाहील.

**<><><><>**

नैऋत्य मोसमी पावसानं आज संपूर्ण देशातून माघार घेतली, त्याचवेळी अग्नेय द्विपकल्पात ईशान्य मोसमी पाऊस सुरु झाला आहे.

बंगालच्या उपसागरात दक्षिणेच्या मध्य भागात कमी दाबाचं लक्षणीय क्षेत्र तयार झालं आहे.

**<><><><>**

देवळाली ते दानापूर या शेतकरी समृद्धी विशेष गाडीला आज रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून  हिरवा झेंडा दाखवला. या गाडीमुळे शेतकऱ्यांना केवळ प्रतिकिलो चार रुपये या माफक दरात मालवाहतूक करता येईल असं वैष्णव यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्रातल्या दहा स्थानंकांचा अमृत स्थानक म्हणून विकास होईल असंही ते म्हणाले.

<><><><><>

राज्यातल्या निवडणुकांसाठी काँग्रेस आणि महाविकास आघाडी सज्ज असून आघाडी २८८ जागांवर लढणार आहे, असं काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी म्हटलं आहे. ते नाशिक इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्याच्या तिजोरीत पैसै नाहीत, निधीची तरतूद नसतानाही दोन महिन्यात युती सरकारने जनतेची दिशाभूल करणाऱ्या घोषणा केल्या आहेत, असा आरोप त्यांनी केला.

<><><><><>

ऐतिहासिक अर्थसंकल्प, लाडकी बहीण योजना, तीन मोफत गॅस सिलिंडर आणि शेतकऱ्यांसाठी वीजबिल माफी अशा योजना आणि निर्णयाद्वारे राज्य सरकारने लोकोपयोगी काम केल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबई मेट्रो-३ सेवेच्या टी-2 स्थानकापासून आंतरराष्ट्रीय विमानतळ जवळ असल्याने मुंबई मेट्रो प्राधिकरणाने विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी मोफत बससेवा सुरू केली आहे. मुंबई मेट्रो रेल्वे प्राधिकरणाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात ही माहिती दिली आहे. या बसमध्ये प्रवाशांना त्यांच्या सामानासाठी लोडर सुविधाही उपलब्ध असेल.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकणात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.